**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या शुक्रवार दि. २८ जानेवारी २०११ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत.**

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची १३५ वी बैठक शुक्रवार दि.२८ जानेवारी २०११ रोजी दुपारी ३.०० वा. गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृहात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. सुभाष हजारे, भा.प्र.से. | उप सभापती तथा मुख्य अधिकारी |
| २) | मा. श्री.प्र.ल.पाठक | उप सचिव, महाराष्ट्र शासन |
| ३) | मा.डॉ.श्री.ल.पुलकुंडवार | अवर सचिव, महाराष्ट्र शासन |
| ४) | मा.श्री.बशीर पटेल | सदस्य |
| ५) | मा. श्री. किसन बा. जाधव | सदस्य |
| ६) | मा. श्रीमती सुरेखा पाटील | सदस्या |
| ७) | मा.श्री.सईद खान | सदस्य |
| ८) | मा.श्रीमती उल्का पाटकर | सदस्या |
| ९) | मा.श्री.शरद शिरीषकर | सदस्य |
| १०) | मा.श्री.सुबोध बांदिवडेकर | सदस्य |
| ११) | मा.श्री.व्ही.जी.नायर | सदस्य |
| १२) | मा.श्री.हेमराज शाह | सदस्य |
| १३) | मा.श्री.हरिष सणस | सदस्य |
| १४) | मा. श्री.तारीक फारुकी | सदस्य |
| १५) | श्री.पी.पी.महिषी,<br>निवासी कार्यकारी अभियंता | सचिव |
| १६) | उपकर निर्धारक व संकलक<br>(रिपेअर सेस) महापालिका | निमंत्रक |
| १७) | कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव)<br>शहर महानगरपालिका | निमंत्रक |
| १८) | श्री.ओ.बी.साहू | सह मुख्य अधिकारी |

बैठकीच्या सुरुवातीस सचिव श्री.महिषी यांनी सन्मा.सदस्य श्री.नंदकुमार काळे बैठकीस उपस्थित राहू शकणार नाही, असा त्यांचा दूरध्वनी आल्याचे सांगितले. तसेच सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी श्री.कमरुद्दिन मर्चंट हेही बैठकीस उपस्थित राहू शकणार नाहीत, असे सांगितले. सन्मा.सदस्य श्री.बशीर पटेल यांनी मा.उपाध्यक्ष/प्रा. श्री.गौतम चटर्जी यांची प्रधान सचिव,गृहनिर्माण या पदावर नेमणूक झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. तसेच सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी मा.उपाध्यक्ष/प्रा.यांचे गेल्या 2 वर्षात मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे कामकाज यशस्वी होण्यासाठी जे मार्गदर्शन व सहकार्य लाभले त्याबद्दल मा.प्रधान सचिव,गृहनिर्माण यांचे अभिनंदन केले. तसेच नव्याने आलेले उपाध्यक्ष श्री.सतीश गवई यांचेकडूनही तसेच सहकार्य मिळेल अशी आशा व्यक्त करुन त्यांचेही स्वागत केले.यास सर्व सन्मा.सदस्यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर उपमुख्य अभियंता (परिमंडळ-1) या पदाचा कार्यभार स्विकारलेल्या श्री.प्रदीप आर्गेकर यांनी सभागृहास आपला परिचय करुन दिला. त्यावर सन्मा.सदस्य श्री.किसन जाधवन यांनी असे सांगितले की, त्यांच्या अनुभवाचा दुरुस्ती मंडळास भविष्यकाळात फा

होईल. त्यानंतर सचिव श्री.महिषी यांनी मा. सभापती यांच्या परवानगीने बैठकीच्या कामकाजास सुरुवात केली.

**बाब क्रमांक - १३५.१**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या दि.३०.१२.२०१० रोजी झालेल्या १३४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

मागील बैठकीचे कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.०१ ते १३ वर सादर करण्यात आले.

मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी पान क्र.३ वरील परिच्छेद क्र.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे व्हेकेशन नोटीसकरीता जो अभ्यास गट नेमला होता त्या अभ्यास गटाने अहवाल सादर केला का, अशी विचारणा केली. त्यावर सचिव यांनी असे सांगितले की, श्री.ढोले, अध्यक्ष, अभ्यास गट यांची बदली झाल्यामुळे श्रीमती मेधा शेंडे, उपमुख्य अभियंता/परिमंडळ-२ यांची अभ्यास गटाचे प्रमुख म्हणून नेमणूक केली असून त्यांचा अहवाल नुकताच प्राप्त झाला असून, त्यावर विचार करुन प्रस्ताव मंडळाच्या बैठकीत विचारार्थ सादर करण्यात येईल.

मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी पान क्र.२ वरील परिच्छेद क्र.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे धारावी संक्रमण शिबीराच्या संदर्भात जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचे प्रकरणी जबाबदारी निश्चित करण्याचे मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.यांचेकडे सोपविलेले आहे, ते योग्य आहे. तथापि याबाबत झालेली कार्यवाही मंडळास अवगत करावी, असे सांगितले.

मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी पान क्र.५ वरील परिच्छेद क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रस्ताव मा.उपाध्यक्ष/प्रा.यांचेकडे सादर करण्यात आला का, अशी विचारणा केली. त्यावर मा.मुख्य अधिकारी यांनी असे सांगितले की, मंगलवाडी येथील इमारतीकरीता खिडक्यांच्या डिझाईनबाबतच्या उपमुख्य अभियंता यांचेकडून प्राप्त झालेल्या अहवालात व मुख्य अभियंता-२/प्रा. यांचे अभिप्रायात तफावत आढळल्याने प्रशासकीय मान्यतेचा सुधारित प्रस्ताव सादर करण्याकरीता उपमुख्य अभियंता/परिमंडळ-२ यांना कळविण्यात आले आहे. सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव प्राप्त झाल्यावर मंडळाच्या बैठकीत मान्यतेकरीता सादर करण्यात येईल.

मा.सदस्य श्री.बशीर पटेल यांनी असे सांगितले की, एखाद्या कंत्राटदाराला वर्क ऑर्डर देताना त्या इमारतीमधील कोणत्या गाळयात दुरुस्ती करावयाची आहे, याची माहिती असते,परंतु त्या गाळयात रहाणा-या व्यक्तींना त्याची माहिती नसते. यावर उपमुख्य अभियंता (परिमंडळ-१) श्री.प्रदीप आर्गेकर यांनी असे सांगितले की, मंडळ जेव्हा एखाद्या इमारतीचे दुरुस्तीचे काम हाती घेते, त्या अगोदर इमारतीची दोनदा पहाणी करण्यात येते. पहिल्यांदा अंदाजपत्रक तयार करण्यापूर्वी उप अभियंता व वास्तुशास्त्रज्ञ हे भेट देतात व भाडेकरु/रहिवाशांसोबत चर्चा करुन दुरुस्तीचे नकाशे व अंदाजपत्रक तयार करण्यात येते. त्या नंतर ठेकेदाराच्या नेमणूकीपूर्वी कार्यकारी अभियंता, वास्तुशास्त्रज्ञ, उप अभियंता हे भेट देऊन तेथील भाडेकरु/रहिवाश्यांना दुरुस्तीचा नकाशा दाखवून दुरुस्तीमध्ये काय काम घेतले आहे ते समजावून सांगतात व भाडेकरु/रहिवाश्यांच्या भेटीच्यावेळी सहया सुध्दा घेतल्या जातात. परंतु मा.सदस्य यांनी पूर्वी ही पध्दत चालत होती आता तसे आढळून येत नसल्याचे सांगितले व ही कार्यपध्दती पुन्हा सुरु झाली पाहिजे असे सन्मा.सदस्य श्री.हेमराज शहा यांनी सांगितले. यास मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी पाठिंबा दिला व

असे मत व्यक्त केले की, इमारतींचे आयुष्य वाढवावयाचे असेलतर महापालिकेच्या धर्तीवर जसे महानगरपालिकेमध्ये एखाद्या नगरसेवकाच्या विभागामध्ये जर महानगरपालिकेची घरे किंवा इमारती असतील तर तेथील भाडेकरुंच्या इमारतीकरीता किंवा घराकरीता बजेटमध्ये वेगळी प्रोव्हीजन करुन दिली जाते. त्या इमारतीवर भाडेकरुप्रमाणे माणशी हिशेबाने खर्च न करता त्या इमारतीच्या दुरुस्तीसाठी लागणरा सर्व खर्च हा बजेटच्या तरतूदीमधून केला जातो. अशाचप्रकारे जर मंडळाने जुन्या इमारतींकरीता दुरुस्तीचा प्रस्ताव तयार करुन शासनाकडे सादर केल्यास दुरुस्ती करण्याच्या पध्दतीत अमुलाग्र बदल झाल्यासारखे होईल. तसेच, जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींची जेएनयुआरएम खाली दुरुस्ती करता येणे शक्य आहे काय याकरीता व वरील अभ्यासाकरीता एखादा अभ्यास गट नेमावा. यावर मा.मुख्य अधिकारी यांनी असे सांगितले की, या करीता तीन ते चार सन्मा.सदस्य, एक उपमुख्य अभियंता, दोन कार्यकारी अभियंता यांचा मिळून एक अभ्यास गट तयार करुन सुधारित कार्यपध्दतीबाबत अभ्यास करता येईल. या करीता ज्या सन्मा.सदस्यांना या अभ्यास गटात यावयाचे आहे त्यांनी त्यांची नावे निवासी कार्यकारी अभियंता यांचेकडे द्यावीत. निवासी कार्यकारी अभियंता यांनी संबंधितांशी संपर्क साधून अभ्यास गट नेमण्याचा प्रस्ताव मुख्य अधिकारी यांचेकडे सादर करण्याचे ठरले.

वरील सविस्तर चर्चेअंती कार्यवृत्तांत स्थायी करण्यात आले.

**बाब क्रमांक - १३५.२ (१)**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-१ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे. परिमंडळ-१ मधील (अ,सी-१/२/३ विभाग) १९ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. १५ ते २७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३५/११५९**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण १९ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.३,०८,१६,७२७/-(रुपये तीन कोटी,आठ लक्ष,सोळा हजार,सातशे सत्तावीस फक्त) एवढ्या रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्याची रक्कम रु.१,९३,४१,१२९/- (रुपये एक कोटी, त्र्याण्णव लक्ष, एकेचाळीस हजार, एकशे एकोणतीस फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १३५.२ (२)**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-२ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे. परिमंडळ-२ मधील (डी-१,डी-२,ग-दक्षिण) ११ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. २९ ते ३७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३५/११६०**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण ११ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.१,८५,७८,९४९/-(रुपये एक कोटी, पंच्याऐंशी लक्ष,अठ्ठयाहत्तर हजार,नऊशे एकोणपन्नास फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.१,०५,८४,६५९/- (रुपये एक कोटी, पाच लक्ष, चौ-याऐंशी हजार, सहाशे एकोणसाठ फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १३५.२ (३)**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-३ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे.
परिमंडळ-३ मधील (बी,ई-१,ई-२) १५ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ३९ ते ४९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३५/११६१**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण १५ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.३,५४,५८,४५५/-(रुपये तीन कोटी, चोपन्न लक्ष,अठ्ठावन्न हजार,चारशे पंचावन्न फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.२,११,६७,९८७/- (रुपये दोन कोटी, अकरा लक्ष, सदुसष्ट हजार, नऊशे सत्याऐंशी फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १३५.२ (४)**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-४ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे.
परिमंडळ-४ मधील (फ/द व फ/उ विभाग) ०२ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ५१ ते ५५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३५/११६२**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण ०२ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.५०,३६,९३३/-(रुपये पन्नास लक्ष, छत्तीस हजार,नऊशे तेहतीस फक्त) एवढया रकमेच्या

अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.३९,१९,८२८/- (रुपये एकोणचाळीस लक्ष, एकोणीस हजार, आठशे अठ्ठावीस फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १३५.२ (५)**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-४ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे. परिमंडळ-४ मधील (फ/द,फ/उ ,ग/उ विभाग) १६ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ५७ ते ६५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३५/११६३**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण १६ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.२,८५,५४,४८७/-(रुपये दोन कोटी, पंच्याऐंशी लक्ष,चोपन्न हजार,चारशे सत्याऐंशी फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.२,०७,६९,१०७/- (रुपये दोन कोटी, सात लक्ष, एकोणसत्तर हजार, एकशे सात फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १३५.३**

विषय - मुं.इ.दु.व पु.मंडळातंर्गत बांधण्यात आलेल्या पुनर्रचित इमारतीतील अतिरिक्त सदनिका, विकास नियंत्रण नियमावली ३३(७) / ३३(९) अंतर्गत तसेच संक्रमण शिबिराच्या पुनर्विकासातून व इतर माध्यमातून म्हाडाकडे उपलब्ध होणाऱ्या सदनिकामधून बृहतसूचीमधील भाडेकरु / रहिवाशी यांना सदनिका वितरण करण्याचे धोरण.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.६७ ते ७५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी पृष्ठ क्र.६९ वरील पहिल्या परिच्छेदामध्ये पात्र व इच्छुक भाडेकरुंना बृहतसूचीवर घेण्याकरीता त्यांचे संक्रमण शिबीरात ५ वर्षे वास्तव्य असावे असे म्हटले आहे. एखाद्या भाडेकरुने संक्रमण शिबीरातील गाळा घेतलेला नसेल व स्वतःची पर्यायी व्यवस्था करुन दुसरीकडे रहात असेल त्याच्याकडे जुन्या इमारतीमधील वास्तव्याचे संपूर्ण दस्तऐवज असतील तर त्याचा हक्क आपण नाकारणार आहात काय, असे विचारले असता मा.मुख्य अधिकारी यांनी असे सांगितले की,जे भाडेकरु/रहिवाशी वर्षानुवर्षे संक्रमण शिबीरात रहात आहेत, त्यांची इमारत रस्ता रुंदीकरण, करमणुकीचे मैदान, खेळाचे मैदान इ.आरक्षणास्तव होणार नाही अशांना बृहतसूचीवर घेण्याचे धोरण आहे. यामध्ये आपण बदल केला आहे. संक्रमण शिबीरात २५-३० वर्ष रहात आहेत त्यांची इमारत होवू शकते पण काही अडचणींमुळे इमारत होवू शकलेली नाही व नजिकच्या काळातही होणार नाही त्यांना आपण बृहतसूचीवर घेणार आहोत.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी वि.नि.नि. ३३ (७) व ३३ (९) अंतर्गत प्राप्त होणा-या सर्व सदनिकांना वितरण करण्याकरीता सदर धोरण लागू होईल किंवा कसे, याबाबत विचारणा केली असता मा.मुख्य अधिकारी,दु.व पु.यांनी सदर धोरण हे सगळ्या नियमावलीखाली प्राप्त होणा-या गाळयांकरीता लागू राहिल असे सांगितले.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी असे सांगितले की, पूर्वी बृहत्सूचीवरील पात्र सदनिकांपैकी १० टक्के सदनिका वाटपाचे अधिकार हे मा.सभापती यांना राखीव ठेवलेले होते. अशा प्रकारचा उल्लेख या धोरणामध्ये नाही. तो उल्लेख करण्यात यावा. उपलब्ध सदनिकांमधून १० टक्के पात्र असलेल्या लोकांकरीता मा.सभापती तसेच सदस्यांना अधिकार ठेवावेत.

तसेच सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी असे सांगितले की, बृहत्सूचीवर जेवढे गाळे उपलब्ध आहेत त्याच्यापेक्षा १० किंवा २० टक्के भाडेकरु/रहिवाशांना कळविण्यात यावे. यावर मा.मुख्य अधिकारी यांनी असे सांगितले की, बृहत्सूचीवर उपलब्ध असलेल्या गाळ्यांची यादी प्रसिध्द करण्यात येते. तसेच बृहत्सूचीसाठी मुंबई मंडळाचे गाळे उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. उपनगरात संक्रमण शिबीराचे काम चालू आहे. त्यामुळे त्यातील काही गाळे उपलब्ध होवू शकतील. अशाप्रकारे गाळयांची उपलब्धता प्रसिध्द करण्यात येवून आलेल्या अर्जांमधून प्राधान्याने गाळयांचे वाटप होणार आहे.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी धोरणामध्ये एखाद्या अर्जदाराने मागणी केलेली सदनिका त्याच्या मूळ उपकरप्राप्त इमारतीमधील सदनिकेच्या क्षेत्रापेक्षा ५ टक्के क्षेत्रफळ जास्त असलेतरी ती सदनिका वितरीत करण्याची तरतूद केली असल्याचे सांगितले. परंतु, ५ टक्के म्हणजे ३०० चौ.फूटाची सदनिका वितरीत करावयाची झाल्यास १५ चौ.फूट जास्त होते. तरी ते प्रमाण वाढविण्याबाबत विचार व्हावा. यावर सर्व सन्मा.सदस्यांनी चर्चा करुन धोरणामध्ये मूळ सदनिकेच्या क्षेत्रफळापेक्षा साधारणतः ५ टक्के परंतु जास्तीत जास्त ५० चौ.फूट अधिक क्षेत्रफळाची सदनिका उपलब्धतेनुसार देण्याच्या सुधारणेसह धोरणास मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३५/११६४**

मुं.इ.दु.व पु.मंडळातंर्गत बांधण्यात आलेल्या पुनर्रचित इमारतीतील अतिरिक्त सदनिका, विकास नियंत्रण नियमावली ३३(७) /३३(९) अंतर्गत तसेच संक्रमण शिबिराच्या पुनर्विकासातून व इतर माध्यमातून म्हाडाकडे उपलब्ध होणाऱ्या सदनिकामधून बृहतसूचीमधील भाडेकरु / रहिवाशी यांना सदनिका वितरण करण्याचे धोरणास खालील बदलासह सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

१. उपलब्ध सदनिकांपैकी १० टक्के सदनिका वाटपाचे अधिकार सभापती,उप सभापती किंवा सदस्यांच्या समितीस देण्यात यावेत.

२. मूळ उपकरप्राप्त इमारतीमधील सदनिकेच्या क्षेत्रफळापेक्षा साधारणतः ५ टक्के परंतु जास्तीत जास्त ५० चौ.फूट अधिक क्षेत्रफळाची सदनिका उपलब्धतेनुसार सदनिका देण्यात यावी.

**बाब क्रमांक - १३५.४**

**पुनर्विकास**

विषय - मुंबई बेटावरील अ वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.

१. भुकर पहाणी क्र.१/१६३१, प्लॉट क्र.२०३, माहिम विभाग, इ.क्र.२८-ए, डी.एल.वैद्य रोड, दादर (प), मुंबई ४०००२८ येथील 'सहकार सदन' 'ग-उत्तर विभाग '.

२. भुकर पहाणी क्र.११२२, गिरगाव विभाग, इ.क्र.३२७-३२९ व ३३१ आणि ३३१ ए ए, मौलाना शौकत अलि मार्ग, शालिमार सिनेमा जवळ, ग्रँटरोड, मुंबई ४००००७ येथील 'मातावाडी' 'डी-२ विभाग'.

३. भुकर पहाणी क्र.१९८१, भायखळा विभाग इ.क्र.२३-२७, २५ए-२६सी, २५डी, २५ई व २५ एफ, एम.ए.रोड, मुंबई येथील 'पिर मोहम्मद चाळ किंवा शिव आशिष बिल्डिंग' 'ई-२ विभाग'.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.७७ ते ८७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत, सदर प्रस्तावांवर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३५/११६५**

मुंबई बेटावरील खालील ३ मालमत्तांवरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्तावांत नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

१. भुकर पहाणी क्र.१/१६३१, प्लॉट क्र.२०३, माहिम विभाग, इ.क्र.२८-ए, डी.एल.वैद्य रोड, दादर (प), मुंबई ४०००२८ येथील 'सहकार सदन' 'ग-उत्तर विभाग '.

२. भुकर पहाणी क्र.११२२, गिरगाव विभाग, इ.क्र.३२७-३२९ व ३३१ आणि ३३१ ए ए, मौलाना शौकत अलि मार्ग, शालिमार सिनेमा जवळ, ग्रँटरोड, मुंबई ४००००७ येथील 'मातावाडी' 'डी-२ विभाग'.

३. भुकर पहाणी क्र.१९८१, भायखळा विभाग इ.क्र.२३-२७, २५ए-२६सी, २५डी, २५ई व २५ एफ, एम.ए.रोड, मुंबई येथील 'पिर मोहम्मद चाळ किंवा शिव आशिष बिल्डिंग' 'ई-२ विभाग'.

मूळ विषयसूची संपल्याचे सचिव यांनी जाहिर करुन मा.उपसभापती व सन्मा.सदस्यांची परवानगी असल्यास आयत्यावेळेचे विषय मांडण्यात येतील असे सांगीतले. आयत्यावेळेचे विषय मांडण्यासाठी सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

<u>आयत्यावेळेचे विषय</u>

**बाब क्रमांक - १३५.२ (६)**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-१ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे. परिमंडळ १ मधील (अ, सी-१, सी-२, सी-३) १५ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ८९ ते ९९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३५/११६६**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण १५ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.२,०७,१७,३७६/-(रुपये दोन कोटी,सात लक्ष,सतरा हजार,तीनशे शहात्तर फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.१,१०,२३,१३५/- (रुपये एक कोटी, दहा लक्ष, तेवीस हजार, एकशे पस्तीस फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १३५.२ (७)**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-१ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे. **परिमंडळ-३** मधील (बी, ई-१, ई-२) ११ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. १०१ ते १०९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३५/११६७**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण ११उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.१,७३,४३,२५०/-(रुपये एक कोटी,त्र्याहत्तर लक्ष,त्रेचाळीस हजार,दोनशे पन्नास फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.१,१८,५६,१७९/- (रुपये एक कोटी, अठरा लक्ष, छप्पन्न हजार, एकशे एकोणऐंशी फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १३५.५**

विषय - इमारत क्र. २९ पाठक निवास, विन्सेंट स्के. रोड, दादर (पूर्व) या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती कामास सुधारित मंजुरी देण्याबाबत.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. १११ ते ११३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३५/११६८**

इमारत क्र. २९ पाठक निवास, विन्सेंट स्के. रोड, दादर (पूर्व) या इमारतीच्या दुरुस्ती कामाच्या सुधारित अंदाजपत्रकांस रु.१४,१९,६६६/- एवढया रक्कमेस सर्वानुमते सुधारित प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली

**बाब क्रमांक - १३५.६**

विषय - इमारत क्र. १४२-१५६ डॉ. मस्करन्हस रोड या इमारतीच्या दुरुस्ती कामाला प्रशासकीय मान्यतेवरील रक्कमेस मंजूरी मिळण्याबाबत.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ११५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३५/११६८**

इमारत क्र. १४२-१५६ डॉ. मस्करन्हस रोड या इमारतीच्या दुरुस्ती कामाला प्रशासकीय मान्यतेवरील वाढीव रक्कम रु.६८,२१९/- या जादा रकमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली

**बाब क्रमांक - १३५.७ (१)**

विषय - शुध्दीपत्रक :- इ.क्र.७ बेहनाम हॉल प्रशासकीय मान्यतेच्या रक्कमेतील झालेल्या बदलाबाबत.

उारोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ११७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३५/११६९**

इ.क्र.७ बेहनाम हॉल प्रशासकीय मान्यतेच्या रक्कमेतील निव्वळ टप्प्याची प्रशासकीय मान्यतेची एकूण रक्कम रु.४,६५,०२२/- ऐवजी प्रशासकीय मान्यतेची एकूण रक्कम रु.५,६४,०२२- अशी वाचण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**बाब क्रमांक - १३५.७ (२)**

विषय - शुध्दीपत्रक :- इ.क्र.३८१-सी, व्ही. पी. रोड, प्रशासकीय मान्यता देताना तळ+३ मजले ऐवजी तळ+३+४ (पार्ट) असा फेरबदल करण्याबाबत.

उारोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ११९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३५/११७०**

इ.क्र.३८१-सी, व्ही. पी. रोड, प्रशासकीय मान्यता देताना तळ+३ मजले ऐवजी तळ+३+४ (पार्ट) असा फेरबदल करण्याबाबत सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**बाब क्रमांक - १३५.८ (१)**

विषय - उपमुख्य अभियंता-परिमंडळ-२ मधील ग/दक्षिण विभागातील मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत

उारोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. १२१ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी चर्चेमध्ये सूचना केली की, इमारतीस टेकू लावताना ते योग्य त्या आकाराचे लावले असल्याची दक्षता घ्यावी. यावर मा.मुख्य अधिकारी यांनी उपस्थित सर्व कार्यकारी अभियंता यांना मंडळातर्फे उपकरप्राप्त इमारतीत लावण्यात येणा-या टेकूंचे आकार जसे २.५ इंच, ३ इंच, ४ इंच व्यासाची जाडी त्याचप्रमाणे उंची याबाबत बाबीमध्ये विनिर्देश केल्यानुसार लावण्याबाबत दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या.

चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३५/११७१**

उपमुख्य अभियंता परिमंडळ-२ मधील ग/दक्षिण विभागातील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास रक्कम रु.५,५२,५९६/- या रक्कमेस प्रशासकीय मंजूरी देण्यात आली.

**बाब क्रमांक - १३५.८ (२)**

विषय - उपमुख्य अभियंता-परिमंडळ-२ मधील डी-१ विभागातील मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. १२३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावावर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३५/११७२**

उपमुख्य अभियंता परिमंडळ-२ मधील डी-१ विभागातील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास रक्कम रु.५,८७,८५२/- या रक्कमेस प्रशासकीय मंजूरी देण्यात आली.

**बाब क्रमांक - १३५.४**

**पुनर्विकास**

विषय - मुंबई बेटावरील अ वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.

४. भूकर पहाणी क्र.५८५/६, सायन विभाग, प्लॉट क्र.२८५, सायन माटुंगा इस्टेट, इमारत क्र.२६६१, सायन रोड, सायन (पूर्व), मुंबई २२ 'पाटणकर बिल्डींग' 'फ-उत्तर विभाग'.

५. अंतिम भूखंड क्र.४२०-टी.पी.एस.४ माहिम विभाग, इ.क्र.१८८ व १८२-ए, भवानी शंकर रोड, दादर (पश्चिम), मुंबई २८, 'मेमन चाळ' 'ग-उत्तर विभाग'.

६. भुकर पहाणी क्र.१३८८ भायखळा विभाग, इ.क्र.२७-३१ टँक स्ट्रिट, नशेमन को.ऑप.हौ.सो. लिमीटेड मुंबई येथील 'दुधवाला बिल्डिंग' 'ई-२ विभाग'.

७. भुकर पहाणी क्र.१८९९, भायखळा विभाग, इ.क्र.८६-८६अे, मौलाना आझाद रोड, मुंबई येथील 'सईद मंजिल' 'ई-२ विभाग'

८. भुकर पहाणी क्र.८००, ८०१ व ८०२, मांडवी विभाग, इ.क्र.३१-३३-३५, ३७-३९ व २७-२९, वी.वी.चंदन स्ट्रिट, मुंबई येथील 'डोंगरसी हाऊस व लालजी डोंगरसी' 'बी-१ विभाग'.

९. भुकर पहाणी क्र.२३२४ (भाग) व २३२५ (भाग) भुलेश्वर विभाग इ.क्र.२-१६, १३१-१४५, १५५ बी आणि १५५सी, भुलेश्वर रोड, मुंबई येथील 'राम मंदिर चाळ व समुद्री माता मंदीर चाळ' 'सी-२ विभाग'.

१०. भुकर पहाणी क्र.१९४४, १/१९४४, २/१९४४, ३/१९४४, ४/१९४४ आणि ५/१९४४ भायखळा विभाग, इ.क्र.६१६-ए, ६१६-बी, ६१६-सी, ६१६-डी, ६१६-ई, ६१६-एफ/जी, ६१६-एच, ६१६-आय, ६१६-के, ६१६-एल, ६१६-एम, ६१६-एन, ६१६-पी, ६१६-ओ व ६१८-६२० आणि ६१२-६१४ एन. एम जोशी मार्ग, मुंबई-४०००२७ येथील 'लक्ष्मी बिल्डींग' 'ई-२ विभाग'.

११. भूकर पहाणी क्र.४०९ मलबार कंबाला हिल विभाग, इ.क्र.३४ आणि ३४-ए, पंडिता रमाबाई मार्ग, मुंबई येथील 'पाठारे प्रभू चॅरिटीज' 'डी-३'.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.१२५ ते १६१ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत, सदर प्रस्तावांवर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३५/११६५**

मुंबई बेटावरील खालील ८ मालमत्तांवरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्तावांत नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

४. भूकर पहाणी क्र.५८५/६, सायन विभाग, प्लॉट क्र.२८५, सायन माटुंगा इस्टेट, इमारत क्र.२६६१, सायन रोड, सायन (पूर्व), मुंबई २२ 'पाटणकर बिल्डींग' 'फ-उत्तर विभाग'.

५. अंतिम भूखंड क्र.४२०-टी.पी.एस.४ माहिम विभाग, इ.क्र.१८८ व १८२-ए, भवानी शंकर रोड, दादर (पश्चिम), मुंबई २८, 'मेमन चाळ' 'ग-उत्तर विभाग'.

६. भुकर पहाणी क्र.१३८८ भायखळा विभाग, इ.क्र.२७-३१ टँक स्ट्रिट, नशेमन को.ऑप.हौ.सो. लिमीटेड मुंबई येथील 'दुधवाला बिल्डिंग' 'ई-२ विभाग'.

७. भुकर पहाणी क्र.१८९९, भायखळा विभाग, इ.क्र.८६-८६अे, मौलाना आझाद रोड, मुंबई येथील 'सईद मंजिल' 'ई-२ विभाग'

८. भुकर पहाणी क्र.८००, ८०१ व ८०२, मांडवी विभाग, इ.क्र.३१-३३-३५, ३७-३९ व २७-२९, वी.वी.चंदन स्ट्रिट, मुंबई येथील 'डोंगरसी हाऊस व लालजी डोंगरसी' 'बी-१ विभाग'.

९. भुकर पहाणी क्र.२३२४ (भाग) व २३२५ (भाग) भुलेश्वर विभाग इ.क्र.२-१६, १३१-१४५, १५५ बी आणि १५५सी, भुलेश्वर रोड, मुंबई येथील 'राम मंदिर चाळ व समुद्री माता मंदीर चाळ' 'सी-२ विभाग'.

१०. भुकर पहाणी क्र.१९४४, १/१९४४, २/१९४४, ३/१९४४, ४/१९४४ आणि ५/१९४४ भायखळा विभाग, इ.क्र.६१६-ए, ६१६-बी, ६१६-सी, ६१६-डी, ६१६-ई, ६१६-एफ/जी, ६१६-एच, ६१६-आय, ६१६-के, ६१६-एल, ६१६-एम, ६१६-एन, ६१६-पी, ६१६-ओ व ६१८-६२० आणि ६१२-६१४ एन. एम जोशी मार्ग, मुंबई-४०००२७ येथील 'लक्ष्मी बिल्डींग' 'ई-२ विभाग'.

११. भूकर पहाणी क्र.४०९ मलबार कंबाला हिल विभाग, इ.क्र.३४ आणि ३४-ए, पंडिता रमाबाई मार्ग, मुंबई येथील 'पाठारे प्रभू चॅरिटीज' 'डी-३'.

**बाब क्रमांक - १३५.९**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-३ मधील बी-२ विभागातील दि.२६.०१.२०११ रोजी २-१४ तांडेल स्ट्रीट, अब्दुल्ला मॅन्शन या पडझड झालेल्या इमारतीच्या दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.१६३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३५/११७३**

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-३ मधील बी-२ विभागातील २-१४ तांडेल स्ट्रीट, अब्दुल्ला मॅन्शन या जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.२८,५९,८९३/-(रुपये अठ्ठावीस लक्ष,एकोणसाठ हजार,आठशे त्र्याण्णव फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकास निव्वळ टप्प्याची रक्कम रु.११,६८,८३०/- (रुपये अकरा लक्ष, अडुसष्ट हजार, आठशे तीस फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

सन्मा.सदस्य श्री.शरद शिरीषकर यांनी त्यांना दिलेल्या रिक्त गाळयांच्या यादीबद्दल नाराजी व्यक्त केली व त्यांनी मुळ ११७ रिक्त सदनिकांची यादी सादर करुन त्यावर सद्यस्थिती अहवाल देण्याची विनंती केली. त्यावर मा.मुख्य अधिकारी यांनी सर्व कार्यकारी अभियंता यांना अशा सूचना केल्या की, त्यांनी आजच रिक्त गाळयांची यादी उपमुख्य अधिकारी (पु.गा.) कडून घेवून त्यातील त्यांच्या विभागाची माहिति भरुन १५ दिवसात सादर करावी. उपमुख्य अधिकारी (पु.गा.) यांनी सर्व माहिती संकलित करुन पुढील बैठकीत सादर करावी, अशा सूचना दिल्या.

सन्मा.सदस्य श्री.शरद शिरीषकर यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, दुरुस्तीचे काम सुरु करतेवेळी संबंधित कार्यकारी अभियंता काम सुरु झाल्याची माहिती देत नाहीत. तसेच कामाच्या ठिकाणी माहिती फलक लावून त्यावर कामाबद्दल विस्तृत माहिती जसे

१. अधिका-याचे नाव व संपर्क दूरध्वनी क्रमांक

२. वास्तुशास्त्रज्ञाचे नाव व संपर्क दूरध्वनी क्रमांक

३. ठेकेदाराचे नाव

४. कामाची अंदाजपत्रकीय रक्कम

५. कामाचा कालावधी इ.माहिती फलकावर भाडेकरु/रहिवाशांच्या माहितीसाठी लावली जात नाही.

त्यावर मा.मुख्य अधिकारी यांनी सर्व कार्यकारी अभियंता यांना काम सुरु करतेवेळी दुरुस्ती काम सुरु करण्यात यावयाच्या ठिकाणी मोठ्या आकाराचा फलक लावून त्यावर विस्तृत माहिती देण्याबाबत सूचना दिल्या.

बैठकीच्या अखेरीस मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी यांनी सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहिर केले.

सचिव तथा निवासी कार्यकारी अभियंता,
मुं.इ.दु.व पु.मंडळ

मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी, २/२/९९
मुं.इ.दु.व पु.मंडळ